News Paper cutting file




सरकारचा निषेध करण्याचे आवाहन केले होते. त्यामुळे धनगर समाजाच्या आरक्षणावरुन सरकारला जागे करण्यासाठी ग्रामीण भागातून आंदोलनास सुरुवात होऊ लागली आहे. १९ डिसेंबरपर्यंत बोरी व परिसरातील ग्रामस्थ घरावर काळ्या गुढ्या लावून निषेध करणार असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष रामचंद्र जोरी यांनी दिली.




...पूर | कोल्हापूर | अकोला | गोवा येथून एकाच वेळी प्रकाशित । आर. एन. आय. रजिस्ट्रेशन क्र. ७२०६३/१९९९ । वर्ष :२० अंक : १० www.facebook.com/lokmat | @MiLOKMAT | www.lokm...

# लोकमत

महाराष्ट्राचा मानबिंदू

...र्य डॉ. जे. ओ. बच्छाव, प्रा. ...खुंडे, धनराज पाटील, सविता ..., राहुल सलवदे, प्रियंका ...वाड हे उपस्थित होते.

## ...कार प्रतीक्षा

...र बांधकाम करण्याचे सर्व ... धम्मभूमी सुरक्षा समितीला ... आले असल्याचे सांगण्यात ... या वेळी कॅन्टोन्मेन्टचे ...राव तंतरपाळे, अशोक ...वाड, धर्मपाल तंतरपाळे, ... भोसले, बापू गायकवाड, ... पवार आदी उपस्थित होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ...बुद्ध मूर्तीची प्रतिष्ठापना दि २५ ... १९५४ असे ऐतिहासिक ...हस्ताक्षर कोरले आहे. डॉ. ...साहेब आंबेडकर, डॉ. माईसाहेब ...डकर व तत्कालीन मान्यवरांचे ...फलकही येथे लावले आहे. असे ...काही कार्यकर्ते त्यात ...ड करीत आहेत. त्यामुळे ...साची विटंबना होत आहे. ...क बुद्ध वंदनेच्या बैठकीत ... आणण्याचे काम केले ... आहे. दहशत माजविली जात ... याबाबत पोलिसांना ...ण्यात आले आहे, असे टेक्सास ...कवाड यांनी या वेळी सांगितले. ... एकत्र येऊन ऐतिहासिक ...विहार बांधकाम व विकास ... हरकत नसल्याचे गायकवाड ... या वेळी सांगितले.

भागात जनरल मोटर्स जेसीबी, महिना बेरिंग, फासको, हुसको अशा छोट्या-मोठ्या सुमारे तीस कंपन्या आहेत. याखेरीज एमआयडीसीकडे

## विकासनगरला व्याख्यानमाला

लोकमत न्यूज नेटवर्क

किवळे : येथील विकासनगर व्याख्यानमाला समितीच्या वतीने विकासनगर येथील दत्त मंदिर येथे शनिवारपासून (दि. १५) तीन दिवसीय व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे.

व्याख्यानमालेत शनिवारी (दि. १५) साहित्यिक राजेंद्र थावटे (भारत : एक महासत्ता) पहिले पुष्प गुंफणार आहेत. रविवारी अभिनेते डॉ. संजीवकुमार पाटील (बोले तो टेन्शन... लेने का नही), सोमवारी शैलजा सांगळे (समाधानी जीवन) यांचे व्याख्यान होणार आहे, अशी माहिती व्याख्यानमाला समितीचे अध्यक्ष अविनाश गाडे, उपाध्यक्षा सुनीता पांडे व सचिव सुरेश लुणावत यांनी दिली.

व्याख्यानमालेचे अकरावे वर्षे आहे. प्रमुख पाहुणे म्हणून खासदार श्रीरंग बारणे, नगरसेविका संगीता भोंडवे , प्रज्ञा खानोलकर, नगरसेवक मोरेश्वर भोंडवे, बाळासाहेब ओव्हाळ, उद्योजक हंबीर आवटे, विकासनगर ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष नानासाहेब डोईफोडे, डॉ. विजय चौधरी आदी उपस्थित राहणार आहेत.

टाऊनशिप होणे गरजेचे आहे. या भागातील गावांचा त्यामध्ये समावेश झाल्यानंतर विकासाला गती मिळेल. शासनाने लवकरात लवकर टाऊनशिप उभारावी. - दत्तात्रय पडवळ, नवलाख उंब्रे गावचे सरपंच

...आराखड्यात मान्य करण्यात आलेल्या पार्किंग, ग्रेडिंग, ट्रान्सपोर्ट, कोल्ड स्टोअरेज, हार्वेस्टिंग यासह अन्य सुविधांची वानवा आहे.

# विशेष मुलांसाठी विविध स्पर्धा

## कान्हे फाटा : साईबाबा सेवाधामतर्फे सांस्कृतिक कार्यक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

कामशेत : कान्हे फाटा येथील साईबाबा सेवाधाम संस्थेत सांस्कृतिक कार्यक्रम झाले. मावळ भागातील विशेष, अनाथ व शालेय विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळण्यासाठी विविध स्पर्धांचेही आयोजन केले होते. संस्थेच्या व साई मंदिराचा रौप्यमहोत्सव झाला. विद्यार्थ्यांनी विश्वशांतीसाठी प्रार्थना गायल्या.

संस्थेतील साईमंदिरात साईबाबांच्या मूर्तीला अभिषेक करण्यात आला. कल्पना गोरे, यशवंत गोरे, राजू अगरवाल, मंगेश सातकर, अमित गोरे, गणेश सातकर, गणेश चौरे, सनी आल्हाट आदी दाम्पत्यांच्या हस्ते धार्मिक विधी झाले. पुरुषोत्तममहाराज खर्चे व दत्तात्रयमहाराज हजारे यांच्या मार्गदर्शनाखाली धार्मिक विधी करण्यात आले. बाळकृष्ण कडू, अभिषेक धोत्रे, संतोष ढोरे यांच्यासह महाप्रसादासाठी मावळ प्रबोधिनीचे रवींद्र भेगडे, मावळ वारकरी संप्रदाय अध्यक्ष नंदकुमार भसे, छाया धोत्रे, विनोद हुलावळे, नारायण नायर आदींनी सहकार्य केले. रोहन मुथा व सागर सातकर यांनी सजावट केली.



नाटिका : कान्हे फाटा येथे नाटिका सादर करताना चिमुकले.

प्रकाश फोंडके व लीलाबाई पाटील यांचा विशेष सत्कार करण्यात आला. ब्रिगेडियर ओ. पी. वैष्णव, नेत्ररोगतज्ज्ञ डॉ. आदित्य केळकर, चित्रपटनिर्माते विजय कोंडके, कर्नल अनिल काकडे, उद्योजक रश्मीकांत जव्हेरी, किशोरी जव्हेरी, डॉ. वर्षा वाढोकर आदी उपस्थित होते. मच्छिंद्र घोजगे व विक्रम दाभाडे यांनी संस्थेचे विश्वस्त डॉ. प्रेम दयानानी, रोहन दयानानी व जस्मिन पावरी यांच्या कार्याचे कौतुक केले. संस्थेच्या प्रकल्पप्रमुख डॉ. स्वाती वेदक यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन लक्ष्मण शेलार यांनी केले. दत्तात्रय चांदगुडे यांनी आभार मानले. प्रशांत भांगले, सीताराम नेरुरकर, अनिल सिंग, दयानंद मोडकर, मंगेश डोईफोडे, महिंद्र पाटील, सदाशिव वरघडे, भाऊ भुंडे, अनिता खानेकर, रोहिणी अग्रहारकर आदींनी परिश्रम घेतले.

15.12.18